RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ५, अंक ३२(२)] गुरुवार, डिसेंबर २६, २०१९/पौष ५, शके १९४१ [पृष्ठे ९, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ५८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.—** महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. | पृष्ठे १-९ |

दिनांक २४ डिसेंबर २०१९ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**राजेन्द्र ग. भागवत,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २६ डिसेंबर २०१९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

२०१७ चा महा. ४३.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अधिनियम, २०१९, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, दिनांक १ जानेवारी २०२० पासून अंमलात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ च्या खंड (४) मध्ये, "आगाऊ अधिनिर्णय अपील प्राधिकारी", या मजकुरानंतर, "राष्ट्रीय आगाऊ अधिनिर्णय अपील प्राधिकारी", हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. २०१७ चा महा. ४३.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १० ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १० मधील,—

(क) पोट-कलम (१) मध्ये, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येईल :—

"**स्पष्टीकरण.—**दुसऱ्या परंतुकाच्या प्रयोजनांसाठी, जेथवर मोबदला व्याजाच्या किंवा बट्ट्याच्या स्वरूपात दर्शविलेला असेल तेथवर, ठेवी, कर्जे किंवा अग्रिमे देणे यांद्वारे पुरविलेल्या सेवांच्या करमाफ पुरवठ्याचे मूल्य, राज्यातील उलाढालीचे मूल्य निश्चित करताना विचारात घेतले जाणार नाही.";

(ख) पोट-कलम (२) मध्ये,–

(एक) खंड (घ) मध्ये, वाक्याच्या शेवटी आलेला "आणि" हा शब्द वगळण्यात येईल ;

(दोन) खंड (ङ) मध्ये, "उत्पादक नसेल," या मजकुरानंतर, "उत्पादक नसेल ; आणि" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(तीन) खंड (ङ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :–

"(च) ती, नैमित्तिक करपात्र व्यक्ती किंवा अनिवासी करपात्र व्यक्ती यांपैकी कोणीही नसेल :";

(ग) पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(२क) या अधिनियमात एतद्‌विरुध्द काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु कलम ९ ची पोट-कलमे (३) व (४) यांच्या तरतुदींना अधीन राहून, जिची मागील वित्तीय वर्षातील एकूण उलाढाल, पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक झालेली नसेल अशा, पोट-कलम (१) व पोट-कलम (२) अन्वये कर प्रदान करण्याच्या विकल्पास पात्र नसलेल्या कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीस, जर ती,—

(क) या अधिनियमान्वये कर आकारण्यास पात्र नसतील अशा वस्तुंचा किंवा सेवांचा पुरवठा करीत नसेल तर ;

(ख) वस्तुंचा किंवा सेवांचा कोणताही आंतर-राज्य जावक पुरवठा करीत नसेल तर ;

(ग) ज्याने कलम ५२ अन्वये मूळ स्त्रोतातून कराची वसुली करण्याची आवश्यकता आहे अशा इलेक्ट्रॉनिक व्यापार प्रचालकामार्फत वस्तुंचा किंवा सेवांचा कोणताही पुरवठा करीत नसेल तर ;

(घ) परिषदेच्या शिफारशीवरून शासनाकडून अधिसूचित करण्यात येतील अशा वस्तुंची उत्पादक किंवा अशा सेवांची पुरवठादार नसेल तर ; आणि

(ङ) नैमित्तिक करपात्र व्यक्ती किंवा अनिवासी करपात्र व्यक्ती नसेल तर,

कलम ९ च्या पोट-कलम (१) अन्वये तिच्याकडून प्रदेय असलेल्या कराऐवजी, विहित करण्यात येईल अशा दराने परिगणित केलेली, परंतु, राज्यातील उलाढालीच्या तीन टक्क्यांपेक्षा अधिक नसेल अशी रक्कम प्रदान करण्याचा पर्याय असेल :

परंतु, जेव्हा एकाहून अधिक नोंदणीकृत व्यक्तींकडे आयकर अधिनियम, १९६१ अन्वये दिलेला एकच स्थायी लेखा क्रमांक असेल तेव्हा अशा बाबतीत, अशी नोंदणीकृत व्यक्ती, अशा सर्व नोंदणीकृत व्यक्तींनी या पोट-कलमाखाली कर प्रदान करण्याचा विकल्प निवडल्याशिवाय या पोट-कलमाखालील योजनेचा पर्याय निवडण्यास पात्र असणार नाही.";  १९६१ चा ४३.

(घ) पोट-कलम (३) मध्ये, जेथे " पोट-कलम (१) अन्वये " हा मजकूर आला आहे त्या दोन्ही ठिकाणी, त्यानंतर, " किंवा, यथास्थिति, पोट-कलम (२क) अन्वये " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ङ) पोट-कलम (४) मध्ये, " पोट-कलम (१) " या मजकुरानंतर, " किंवा, यथास्थिति, पोट-कलम (२क) " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(च) पोट-कलम (५) मध्ये, " पोट-कलम (१) अन्वये " या मजकुरानंतर, " किंवा, यथास्थिति, पोट-कलम (२क) अन्वये " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(छ) पोट-कलम (५) नंतर, पुढील स्पष्टीकरणे समाविष्ट करण्यात येतील :—

" **स्पष्टीकरण १.—**या कलमाखाली कर प्रदान करण्याची तिची पात्रता निश्चित करण्यासाठी एखाद्या व्यक्तीच्या एकूण उलाढालीची परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ, " एकूण उलाढाल " या शब्दप्रयोगामध्ये, अशा व्यक्तीने, एखाद्या वित्तीय वर्षाच्या १ एप्रिल पासून ते, या अधिनियमान्वये नोंदणी करण्यास ती जेव्हा पात्र ठरते त्या दिनांकापर्यंत केलेल्या पुरवठ्याच्या मूल्याचा समावेश होईल, परंतु, यात, जेथवर मोबदला, व्याजाच्या किंवा बट्ट्याच्या स्वरूपात दर्शविलेला असेल तेथवर, ठेवी, कर्जे किंवा अग्रिमे देण्याच्या मार्गाने पुरविलेल्या सेवांच्या करमाफ पुरवठ्याच्या मूल्याचा समावेश होणार नाही.

**स्पष्टीकरण २.—**या कलमान्वये एखाद्या व्यक्तीकडून प्रदेय असलेला कर निश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ, " राज्यातील उलाढाल " या शब्दप्रयोगामध्ये, पुढील पुरवठ्यांच्या मूल्याचा समावेश होणार नाही :–

(एक) वित्तीय वर्षाच्या १ एप्रिल पासून ते, या अधिनियमान्वये नोंदणी करण्यास अशी व्यक्ती जेव्हा पात्र ठरते त्या दिनांकापर्यंतच्या पुरवठ्यांचा ; आणि

(दोन) जेथवर मोबदला, व्याजाच्या किंवा बट्ट्याच्या स्वरूपात दर्शविलेला असेल तेथवर, ठेवी, कर्जे किंवा अग्रिमे देण्याच्या मार्गाने पुरविलेल्या सेवांच्या करमाफ पुरवठ्याचा. ".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम २२ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम २२ मधील, पोट-कलम (१) मध्ये, दुस-या परंतुकानंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :–

" परंतु तसेच, शासनास, परिषदेच्या शिफारशीवरून, जो केवळ वस्तुंचाच पुरवठा करतो अशा पुरवठादाराच्या बाबतीत अधिसूचित करण्यात येईल अशा शर्तीच्या व मर्यादांच्या अधीन राहून, एकूण उलाढाल वीस लाख रुपयांवरून, चाळीस लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा रकमेपर्यंत, वाढविता येईल.

**स्पष्टीकरण.—**या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, जर एखादी व्यक्ती, जेथवर मोबदला, व्याजाच्या किंवा बट्ट्याच्या स्वरूपात दर्शविलेला असेल तेथवर, ठेवी, कर्जे किंवा अग्रिमे देण्याच्या मार्गाने पुरविलेल्या करमाफ सेवांचा पुरवठा करीत असली तरी देखील अशी व्यक्ती, केवळ वस्तूंचाच पुरवठा करीत असल्याचे समजण्यात येईल. ".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम २५ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम २५ मध्ये, पोट-कलम (६) नंतर, पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील :–

" (६क) प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने आणि मुदतीत, अधिप्रमाणन करून घेईल, किंवा आधार क्रमांक धारण केल्याचा पुरावा सादर करील :

परंतु, जर नोंदणीकृत व्यक्तीला, आधार क्रमांक नेमून दिला नसेल तर, अशा व्यक्तीला, परिषदेच्या शिफारशींनुसार शासन विहित करील अशा रीतीने, ओळखीचे पर्यायी व व्यवहार्य मार्ग उपलब्ध करून देण्यात येतील :

परंतु आणखी असे की, अशा व्यक्तीने, अधिप्रमाणन करण्यात किंवा आधार क्रमांक धारण केल्याचा पुरावा सादर करण्यात किंवा ओळखीची पर्यायी व व्यवहार्य साधने देण्यात कसूर केल्यास, अशा व्यक्तीला नेमून दिलेली नोंदणी, अवैध असल्याचे मानण्यात येईल आणि या अधिनियमाच्या इतर तरतुदी, जणू काही अशा व्यक्तीची नोंदणी केलेली नाही असे समजून लागू होतील.

(६ख) अधिसूचनेच्या दिनांकास व तेव्हापासून प्रत्येक नैसर्गिक व्यक्ती, नोंदणी करून घेण्यास पात्र ठरण्याच्या दृष्टीने, परिषदेच्या शिफारशीवरून, शासन, उक्त अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करील अशा रीतीने अधिप्रमाणन करून घेईल किंवा आधार क्रमांक धारण केल्याबाबतचा पुरावा सादर करील :

परंतु, जर एखाद्या नैसर्गिक व्यक्तीला आधार क्रमांक नेमून दिला नसेल तर, अशा नैसर्गिक व्यक्तीला, परिषदेच्या शिफारशींवरून, शासन, उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट करील अशा रीतीने, ओळखीची पर्यायी व व्यवहार्य साधने उपलब्ध करून देण्यात येतील.

(६ग) अधिसूचनेच्या दिनांकास व तेव्हापासून, एखाद्या नैसर्गिक व्यक्तीव्यतिरिक्त, प्रत्येक व्यक्ती, नोंदणी करून घेण्यास पात्र ठरण्याच्या दृष्टीने, परिषदेच्या शिफारशीवरून, शासन, उक्त अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करील अशा रीतीने, अधिप्रमाणन करून घेईल, किंवा कर्त्याचा, व्यवस्थापकीय संचालकाचा, पूर्ण वेळ संचालकाचा, अशा अनेक भागीदारांचा, संघाच्या व्यवस्थापकीय समितीच्या सदस्यांचा, विश्वस्त मंडळाचा, प्राधिकृत प्रतिनिधींचा, प्राधिकृत स्वाक्षरीकर्त्याचा आणि व्यक्तींच्या अशा इतर वर्गाचा आधार क्रमांक धारण केल्याचा पुरावा सादर करील :

परंतु, जेव्हा अशा व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला, आधार क्रमांक नेमून देण्यात आलेला नसेल अशा बाबतीत, अशा व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला, परिषदेच्या शिफारशींवरून, शासन, उक्त अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करील अशा रीतीने, ओळखीची पर्यायी व व्यवहार्य साधने उपलब्ध करून देण्यात येतील.

(६घ) पोट-कलम (६क) किंवा पोट-कलम (६ख) किंवा पोट-कलम (६ग) यांच्या तरतुदी, शासन, परिषदेच्या शिफारशीवरून, अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला किंवा राज्याच्या भागाला लागू होणार नाहीत.

**स्पष्टीकरण.–**या कलमाच्या प्रयोजनांकरीता, " आधार क्रमांक " या शब्दप्रयोगास, आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ याच्या कलम २ च्या खंड (क) मध्ये त्याला जो अर्थ नेमून दिला असेल, तोच अर्थ असेल.". २०१६ चा १८.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ यामध्ये नवीन कलम ३१क समाविष्ट करणे.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३१ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :–

डिजिटल प्रदानाची सुविधा प्राप्तकर्त्यास उपलब्ध करून देणे.

" **३१ क.** शासनास, परिषदेच्या शिफारशीवरून, जे त्यांनी केलेल्या वस्तुंच्या किंवा सेवांच्या किंवा दोन्हींच्या पुरवठ्याच्या प्राप्तकर्त्यांस इलेक्ट्रॉनिक प्रदानाचे विहित मार्ग पुरवतील आणि विहित करण्यात येतील अशा रीतीने आणि अशा शर्तींच्या व निर्बंधांच्या अधीनतेने अशा प्राप्तकर्त्याला प्रदान करण्याचा पर्याय उपलब्ध करून देतील अशा नोंदणीकृत व्यक्तींचा वर्ग विहित करता येईल.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३९ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३९ मध्ये,—

(क) पोट-कलमे (१) आणि (२) या ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :-

"(१) निविष्टी सेवा वितरक किंवा अनिवासी करपात्र व्यक्ती किंवा कलम १० किंवा कलम ५१ किंवा कलम ५२ यांच्या तरतुदींन्वये कर प्रदान करणारी व्यक्ती यांव्यतिरिक्त, प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, प्रत्येक कॅलेंडर महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी, वस्तुंचा किंवा सेवांचा किंवा दोन्हींचा आवक व जावक पुरवठा, लाभ घेतलेली निविष्टी कराची जमा रक्कम, प्रदेय कर, भरलेला कर व असा अन्य तपशील, यांचे विवरण विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने व मुदतीत इलेक्ट्रॉनिक पध्दतीने दाखल करील :

परंतु, शासनास, परिषदेच्या शिफारशीवरून, ज्या, प्रत्येक तिमाहीसाठी किंवा त्याच्या भागासाठी विवरण सादर करतील अशा नोंदणीकृत व्यक्तींचा विवक्षित प्रवर्ग, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अटी व निर्बंधाच्या अधीन राहून, अधिसूचित करता येईल.

(२) कलम १० च्या तरतुदींन्वये कर प्रदान करणारी नोंदणीकृत व्यक्ती, प्रत्येक वित्तीय वर्षासाठी किंवा त्याच्या भागासाठी राज्यातील उलाढालीचे, वस्तुंच्या किंवा सेवांच्या किंवा दोन्हींच्या आवक पुरवठ्यांचे, देय असलेल्या कराचे, भरलेल्या कराचे आणि अशा इतर तपशिलांचे विवरण, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने व मुदतीत इलेक्ट्रॉनिक पध्दतीने दाखल करील.";

(ख) पोट-कलम (७) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(७) जिने, पोट-कलम (१) च्या परंतुकात किंवा पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (५) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तिव्यतिरिक्त, पोट-कलम (१) अन्वये विवरण सादर करणे आवश्यक आहे, अशी प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, ज्या अंतिम दिनांकापर्यंत तिने असे विवरण सादर करणे आवश्यक आहे त्या दिनांकाच्या नंतरची नसेल अशा दिनांकापर्यंत अशा विवरणाप्रमाणे देय असलेला कर शासनास प्रदान करील :

परंतु, पोट-कलम (१) च्या परंतुकान्वये विवरण सादर करणारी प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, महिनाभरातील वस्तुंचा किंवा सेवांचा किंवा दोन्हींचा आवक व जावक पुरवठा, घेतलेली निविष्टी कराची जमा रक्कम, प्रदेय कर, आणि असा अन्य तपशील विचारात घेऊन, देय असणारा कर, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने, आणि मुदतीत, शासनास प्रदान करील :

परंतु आणखी असे की, पोट-कलम (२) अन्वये विवरण सादर करणारी प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, तिमाहीमधील राज्यातील उलाढाल, वस्तुंचा किंवा सेवांचा किंवा दोन्हींचा आवक पुरवठा, प्रदेय कर, आणि असा अन्य तपशील विचारात घेऊन, देय असणारा कर, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने, आणि मुदतीत शासनास प्रदान करील.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ४४ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४४ च्या पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

"परंतु, आयुक्तास, परिषदेच्या शिफारशीवरून व कारणे लेखी नमूद करून, अधिसूचनेद्वारे, तीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नोंदणीकृत व्यक्तींच्या वर्गासाठी वार्षिक विवरण दाखल करण्याची कालमर्यादा वाढवता येईलः

परंतु आणखी असे की, केंद्रीय कर आयुक्ताने अधिसूचित केलेली कोणतीही वाढीव कालमर्यादा ही, आयुक्ताने अधिसूचित केली असल्याचे मानण्यात येईल.''.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ४९ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४९ मध्ये, पोट-कलम (९) नंतर, पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

''(१०) नोंदणीकृत व्यक्तीस, कराची रक्कम, व्याज, शास्ती, शुल्क किंवा या अधिनियमाखालील इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीमध्ये उपलब्ध असलेली इतर कोणतीही रक्कम, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने, आणि अशा शर्ती व निर्बंधांच्या अधीन राहून, एकात्मिक कर, केंद्रीय कर, राज्य कर किंवा उपकर सामाईक पोर्टलवरून, इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीमध्ये हस्तांतरित करता येईल आणि असे हस्तांतरण या अधिनियमान्वये इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीतून केलेला परतावा असल्याचे मानण्यात येईल.

(११) जेव्हा या अधिनियमाखालील इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीमध्ये कोणतीही रक्कम हस्तांतरित करण्यात आली असेल तेव्हा अशा बाबतीत, ती रक्कम, पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे उक्त खातेवहीमध्ये जमा केली असल्याचे मानण्यात येईल.''.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५० ची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५० च्या पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

''परंतु, एखाद्या कर कालावधीत केलेल्या आणि कलम ३९ च्या तरतुदीनुसार नियत दिनांकानंतर सादर केलेल्या उक्त कालावधीच्या विवरणात घोषित केलेल्या पुरवठ्याच्या बाबतीत प्रदेय असलेल्या करावरील व्याज हे, असे विवरण उक्त कालावधीच्या बाबतीत, कलम ७३ किंवा कलम ७४ अन्वये कोणतीही कार्यवाही सुरू केल्यानंतर सादर केले असेल त्याखेरीज, इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीतून जो कर भरला असेल त्या कराच्या भागावर आकारण्यात येईल.''.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५२ ची सुधारणा.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५२ मध्ये ,—

(क) पोट-कलम (४) मध्ये, पुढील परंतुके समाविष्ट करण्यात येतील :—

''परंतु, आयुक्तास, कारणे लेखी नमूद करून, अधिसूचनेद्वारे, तीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नोंदणीकृत व्यक्तींच्या वर्गासाठी विवरणपत्र दाखल करण्याची कालमर्यादा वाढविता येईलः

परंतु आणखी असे की, केंद्रीय कर आयुक्ताने अधिसूचित केलेली कोणतीही वाढीव कालमर्यादा ही, आयुक्ताने अधिसूचित केली असल्याचे मानण्यात येईल.'';

(ख) पोट-कलम (५) मध्ये, पुढील परंतुके समाविष्ट करण्यात येतील :—

''परंतु, आयुक्तास, परिषदेच्या शिफारशीवरून व कारणे लेखी नमूद करून, अधिसूचनेद्वारे, तीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नोंदणीकृत व्यक्तींच्या वर्गासाठी वार्षिक विवरणपत्र दाखल करण्याची कालमर्यादा वाढविता येईलः

परंतु आणखी असे की, केंद्रीय कर आयुक्ताने अधिसूचित केलेली कोणतीही वाढीव कालमर्यादा ही, आयुक्ताने अधिसूचित केली असल्याचे मानण्यात येईल.''.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ यामध्ये नवीन कलम ५३क समाविष्ट करणे.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५३ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

विवक्षित रकमांचे हस्तांतरण.

''**५३क.** जेव्हा या अधिनियमाखालील इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीतून केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम किंवा एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियम किंवा वस्तू व सेवा कर (राज्य भरपाई) अधिनियम यांखालील इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीमध्ये कोणतीही रक्कम, हस्तांतरित करण्यात आली असेल तेव्हा अशा बाबतीत, शासन, इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीतून हस्तांतरित केलेल्या रकमेइतकी रक्कम, विहित करण्यात येईल अशा रीतीने व मुदतीत, केंद्रीय कर खात्यात किंवा एकात्मिक कर खात्यात किंवा उपकर खात्यात हस्तांतरित करील.''.

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५४ मध्ये पोट-कलम (८) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :- सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५४ ची सुधारणा.

"(८क) जेव्हा केंद्र सरकारने राज्य कराचा परतावा संवितरित केला असेल तेव्हा अशा बाबतीत, शासन, अशा प्रकारे परतावा केलेल्या रकमेइतकी रक्कम केंद्र सरकारला हस्तांतरित करील.".

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९५ मधील,– सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ९५ ची सुधारणा.

(एक) खंड (क) मध्ये,–

(क) "अपील प्राधिकरणाने" या मजकुरानंतर, "किंवा राष्ट्रीय अपील प्राधिकरणाने" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) "कलम १०० च्या पोट-कलम (१)" या मजकुरानंतर, "किंवा केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमाचे कलम १०१ग " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) खंड (ड·) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :-

"(च) "राष्ट्रीय अपील प्राधिकरण" याचा अर्थ, कलम १०१क मध्ये निर्दिष्ट केलेले राष्ट्रीय आगाऊ अधिनिर्णय अपील प्राधिकरण, असा आहे.".

**१५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०१ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :- सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ यामध्ये नवीन कलम १०१क समाविष्ट करणे.

राष्ट्रीय आगाऊ अधिनिर्णय अपील प्राधिकरण.

"**१०१क.** या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, या प्रकरणाच्या तरतुदींना अधीन राहून, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम १०१क अन्वये घटित केलेले राष्ट्रीय आगाऊ अधिनिर्णय अपील प्राधिकरण, या अधिनियमाखालील राष्ट्रीय आगाऊ अधिनिर्णय अपील प्राधिकरण असल्याचे मानण्यात येईल.".

**१६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०२ मध्ये,– सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १०२ ची सुधारणा.

(क) जेथे "अपील प्राधिकरणास" हा मजकूर आला असेल त्या दोन्हीं ठिकाणी, या मजकुरानंतर, "किंवा राष्ट्रीय अपील प्राधिकरणास" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) "कलम ९८ किंवा कलम १०१ " या मजकुराऐवजी, "अनुक्रमे कलम ९८ किंवा कलम १०१ किंवा केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमाचे कलम १०१ग " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) "किंवा अपीलकर्त्याने" या मजकुराऐवजी, ",अपीलकर्त्याने, प्राधिकरणाने किंवा अपील प्राधिकरणाने" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०३ मधील,– सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १०३ ची सुधारणा.

(एक) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :–

"(१क) या प्रकरणाखाली राष्ट्रीय अपील प्राधिकरणाकडून अधिघोषित केलेला आगाऊ अधिनिर्णय,–

(क) ज्यांनी केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम १०१ख च्या पोट-कलम (१) अन्वये, अधिनिर्णयाची मागणी केली होती अशा भिन्न व्यक्ती असलेले अर्जदार आणि आयकर अधिनियम, १९६१ अन्वये दिलेला एकच स्थायी लेखा क्रमांक असणा-या सर्व नोंदणीकृत व्यक्ती ; १९६१ चा ४३.

(ख) खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अर्जदारांच्या आणि आयकर अधिनियम, १९६१ अन्वये दिलेला एकच स्थायी लेखा क्रमांक असणा-या नोंदणीकृत व्यक्तींच्या बाबतीत ; संबंधित अधिकारी व अधिकारिता असलेले अधिकारी, १९६१ चा ४३.

यांच्यावर बंधनकारक असेल.'';

(दोन) पोट-कलम (२) मध्ये, " पोट-कलम (१) " या मजकुरानंतर, " व पोट-कलम (१क) " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १०४ ची सुधारणा.

**१८.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०४ च्या पोट-कलम (१) मध्ये,—

(क) " प्राधिकरण किंवा अपील प्राधिका-यास " या मजकुराऐवजी, " प्राधिकरणास किंवा अपील प्राधिकरणास किंवा राष्ट्रीय अपील प्राधिकरणास", हा मजकूर दाखल करण्यात येईल, आणि " प्राधिकरण किंवा अपील प्राधिकरण " या मजकुरानंतर, " किंवा राष्ट्रीय अपील प्राधिकरण " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) " कलम १०१ च्या पोट-कलम (१) अन्वये " या मजकुरानंतर, " किंवा केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम १०१ग अन्वये " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १०५ ची सुधारणा.

**१९.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०५ मध्ये,—

(क) समास टीपेऐवजी, पुढील समास टीप दाखल करण्यात येईल :—

" प्राधिकरणाचे, अपील प्राधिकरणाचे व राष्ट्रीय अपील प्राधिकरणाचे अधिकार. ";

(ख) पोट-कलम (१) मध्ये, " अपील प्राधिकरण " या मजकुरानंतर, " किंवा राष्ट्रीय अपील प्राधिकरण" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (२) मध्ये, जेथे " अपील प्राधिकरण " हा मजकूर आला असेल त्या दोन्ही ठिकाणी, या मजकुरानंतर, " किंवा राष्ट्रीय अपील प्राधिकरण" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह समाविष्ट करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १०६ ची सुधारणा.

**२०.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०६ मध्ये,—

(क) समास टीपेऐवजी, पुढील समास टीप दाखल करण्यात येईल :—

" प्राधिकरणाची, अपील प्राधिकरणाची व राष्ट्रीय अपील प्राधिकरणाची कार्यपध्दती.";

(ख) " अपील प्राधिकरण " या मजकुरानंतर, " किंवा राष्ट्रीय अपील प्राधिकरण" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १७१ ची सुधारणा.

**२१.** मुख्य अधिनियमाच्या कलम १७१ मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल : —

" (३क) जेव्हा पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेले प्राधिकरण, उक्त पोट-कलमान्वये आवश्यक असलेली तपासणी केल्यानंतर, कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीने पोट-कलम (१) अन्वये, नफेखोरी केली आहे या निष्कर्षाप्रत येते तेव्हा अशा बाबतीत, अशी व्यक्ती, अशा नफेखोरी केलेल्या रकमेच्या दहा टक्के एवढी शास्ती प्रदान करण्यास पात्र असेल :

परंतु, प्राधिकरणाने आदेश दिल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, नफेखोरीची रक्कम जमा केली असेल तर, कोणतीही शास्ती आकारण्यायोग्य असणार नाही.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनार्थ, " नफेखोरी " या शब्दप्रयोगाचा अर्थ, वस्तुंच्या किंवा सेवांच्या किंवा दोन्हींच्या पुरवठ्यावरील कराच्या दरातील घटीचा लाभ, किंवा निविष्टी कर जमा रकमेवरील लाभ, वस्तुंच्या किंवा सेवांच्या किंवा दोन्हींच्या किंमतीमध्ये अनुरूप घट करून त्या मार्गाने प्राप्तकर्त्याला देण्यात न आल्यामुळे निर्धारित केलेली रक्कम, असा असेल." .

**२२.** (१) महाराष्ट्र शासनाने, परिषदेच्या शिफारशीवरून, मुख्य अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) अन्वये काढलेली शासकीय अधिसूचना, वित्त विभाग, क्र. एमजीएसटी/प्र.क.१०३(१)/कराधान-१, दि. २९ जून, २०१७ यास जोडलेल्या अनुसूचीमध्ये, अनुक्रमांक १०३क आणि त्याच्याशी संबंधित नोंदीऐवजी, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईल आणि ती १ जुलै, २०१७ पासून भूतलक्षी प्रभावाने दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल :—

शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र. एमजीएसटी-प्र. क्र. १०३(१)/करा-धान-१, दिनांक २९ जून, २०१७ ची सुधारणा.

| | | |
|---|---|---|
| "१०३क | २६ | युरेनियम ओर कॉन्सनट्रेट (Uranium Ore Concentrate).”; |

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनार्थ, जणूकाही उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) अन्वये उक्त अधिसूचनेत सर्व महत्त्वाच्या वेळी, भूतलक्षी प्रभावाने सुधारणा करण्याचा शासनास अधिकार होता असे समजून, शासनास, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिसूचनेत, भूतलक्षी प्रभावाने सुधारणा करण्याचा अधिकार असेल व असा अधिकार असल्याचे मानण्यात येईल.

(३) जो कर वसूल करण्यात आला आहे, परंतु, जर पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली अधिसूचना सर्व महत्त्वाच्या वेळी अंमलात राहिली असती तर, जो अशा प्रकारे वसूल करता आला नसता, अशा सर्व कराचा परतावा दिला जाणार नाही.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.